# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२२ दिनांक: १९ मे, २०२२

---

जळगाव दि.१९ (प्रतिनिधी) यश हे बाजारात विकत मिळत नाही ते अभ्यास करुन व अथक प्रयत्नांतून मिळवावे लागते. याकरीता विद्यार्थ्यांनी सर्व विषयांचे ज्ञान प्राप्त करणे आवश्यक आहे असे प्रतिपादन खासदार उन्मेष पाटील यांनी केले.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या रसायन तंत्रज्ञान संस्थेत तज्ज्ञांची व्याख्याने आयोजित केली जातात. या उपक्रमांतर्गत खासदार उन्मेष पाटील यांचे व्याख्यान आज गुरुवार दि.१९ रोजी आयोजित करण्यात आले. यावेळी मंचावर संचालक प्रा.जे.बी.नाईक हे अध्यक्षस्थानी होते. यावेळी खासदार उन्मेष पाटील यांनी सांगितले की, अभियांत्रिकी शिक्षणाची ही चार वर्षे विद्यार्थ्यांसाठी सुवर्णकाळ असतो. त्याचा क्षण-क्षण उपयोगात आणून ज्ञान अर्जित केले पाहिजे. इतरांशी वाद करण्यापेक्षा संवाद साधावा. इतरांना दोष देण्यापेक्षा आपल्यातील उणीवा दूर कराव्यात असा सल्ला त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. यावेळी त्यांनी विविध उदाहरणे दिली. अध्यक्षीय समारोप संचालक जे.बी. नाईक केला. परिचय प्रा.उत्कर्षा ग्वालवंशी यांनी तर सूत्रसंचालन प्रा. उस्मानी यांनी केले. आभार प्रा.दीपाली भोळे यांनी मानले. यावेळी बी.टेक. केमीकल टेक्नॉलॉजी व केमिकल इंजिनिअरींगचे विद्यार्थी उपस्थित होते.

**बातमी क्र.२**

जळगाव दि.१९ (प्रतिनिधी) तोकुशिमा विद्यापीठ, तोकुशिमा, जापान व कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांच्या अंतर्गत झालेल्या सामंजस्य कराराअंतर्गत विद्यापीठाच्या पाच विद्यार्थ्यांनी स्पिंग स्कूल उपक्रमांतर्गत १० दिवसांचा अभ्यासक्रम पूर्ण केला. अभ्यासक्रम पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र विद्यापीठाचे कुलगुरुं प्रा. विजय ल. माहेश्वरी यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना देण्यात आले.

यावेळी प्रभारी प्र-कुलगुरु प्रा.एस.टी.इंगळे, व्यवस्थापन परिषद सदस्य दिलीप पाटील, आंतरराष्ट्रीय विद्यार्थी कक्षाचे सल्लागार प्रा.ए.एम.महाजन, प्रभारी कुलसचिव के.एफ.पवार उपस्थित होते. तोकुशिमा विद्यापीठ, तोकुशिमा, जापान व कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ या दोन्ही विद्यापीठाअंतर्गत झालेल्या सामंजस्य कराराच्या अनुषंगाने सुमारे ७-८ वर्षापासून विद्यार्थी व शिक्षक यांची शैक्षणिक उपक्रमांसाठी अदान प्रदान होत असते.

कोरोना महामारी पूर्वी २०१९ पर्यंत दरवर्षी अशा प्रकारच्या आंतरराष्ट्रीय स्कूल्स आयोजित करुन तोकुशिमा विद्यापीठ, जापान येथे जाऊन विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांना तेथील शैक्षणिक उपक्रमांत सहभागी होता येत होते.

परंतू गेल्या दोन शैक्षणिक वर्षापासून ऑनलाईन पध्दतीने आंतरराष्ट्रीय उपक्रमात विद्यापीठाचे विद्यार्थी सहभागी होत आहेत. त्याचाच एक भाग म्हणून नुकतेच १० दिवसांच्या आंतरराष्ट्रीय उन्हाळी स्कूलसाठी विद्यापीठाचे वैष्णवी पाटील, कल्याणी पाटील, तेजस्वीनी बोरसे, विपूल शिंपी व वैभव बोरोकार या पाच विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून हा ऑनलाईन अभ्यासक्रम यशस्वीरित्या ऑनलाईन पूर्ण केला. या विद्यार्थ्यांना तोकुशिमा विद्यापीठाच्या अध्यक्षांच्या सहीचे यशस्वीतेचे प्रमाणपत्र पाठविण्यात आले आहे. हे प्रमाणपत्र कुलगुरुंच्या हस्ते आज वितरित करण्यात आले. जापानच्या विद्यापीठातर्फे प्रोत्साहन म्हणून टी-शर्ट पाठविण्यात आले आहेत. तोकुशिमा विद्यापीठातर्फे डॉ.पंकज कोईनकर व प्रा.मिकितो येसुजावा यांनी या स्प्रिंग स्कूलचे आयोजन केले होते.

**बातमी क्र.३**

जळगाव दि.१९ (प्रतिनिधी) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या केंद्रीय प्रशिक्षण व नियुक्ती कक्षामार्फत विद्यापीठाच्या विविध प्रशाळेतील विद्यार्थ्यांसाठी “ डिझाईन युवर लाईफ ” या विषयावर कार्यशाळा घेण्यात आली.

या कार्यशाळेत जळगाव येथील व्यक्तिमत्व विकास व सॉफ्ट स्कील प्रशिक्षक अलताफ अली सय्यद यांनी जीवन जगण्याची कला यामध्ये दृष्टीकोन, जीवनाचा करीअरच्या उभारणीवर कसा परिणाम होऊ शकतो, नवीन क्षेत्रात कसा प्रवेश करावा, नेटवर्कींग समजून घेण्याचे आणि त्याच्याशी सपर्क साधण्याचे नवीन मार्ग, व्यावसायिक संधीचा कसा पाठपुरावा करावा, आयुष्यावर कसे लक्ष केंद्रीत करावे आदी विषयांवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी अध्यक्षस्थानी समन्वयक प्रा.रमेश सरदार होते. प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्लेसमेंट ऑफीसर सोनाली दायमा यांनी केले. शनिवारी, १४ मे रोजी ही कार्यशाळा विद्यापीठात आयोजित करण्यात आली. एकूण ४५ विद्यार्थी या कार्यशाळेत उपस्थित होते.

---

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय देनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी